QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १५ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १५ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# १५ मिनिटांत पाकने गुडघे टेकले

## अफगाणिस्तानसमोर सपशेल शरणागती, शस्त्रे सोडून सैनिक पळाले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ कुर्रम**

काही दिवसांपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू आहे. काही काळ तणाव थांबला होता. पण, मंगळवारी रात्री अफगाणिस्तान-पाकिस्तान सीमेवर पुन्हा एकदा संघर्ष सुरू झाला. खैबर पख्तूनख्वा येथील कुर्रम जिल्ह्यात अफगाण तालिबान आणि पाकिस्तानी सैन्यात चकमक झाली. परंतु, या चकमकीत पाकिस्तानच्या सैन्याने अवघ्या १५ मिनिटांत शरणागती पत्करल्याची माहिती मिळाली आहे.



स्पिन बोल्डक क्षेत्रात पाकिस्तानी सैन्य आणि अफगाणिस्तानचे सैन्य यांच्यात धुमश्चक्री झाली. अफगाण तालिबानने दावा केला आहे की, पाकिस्तानी सैनिकांशी झालेल्या चकमकीत १५ मिनिटांतच तालिबानने पाकिस्तानी सैनिकांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले आणि त्यांची शस्त्रे जप्त करण्यात आली. आणखी एका व्हिडिओमध्ये दाखवण्यात आले आहे की, लढाईच्या १५ मिनिटांतच तालिबानने पाकिस्तानी सैनिकांची शस्त्रे हिसकावून घेतली.

**स्थानिकांची घरे उद्धवस्त, रहिवाशांनी पळ काढला**

स्पिन बोल्डक जिल्ह्याचे माहिती प्रमुख अली मोहम्मद हकमल यांनी सांगितले की, सध्या लढाई सुरू असून, दोन्ही बाजूने गोळीबार होण्याचा आवाज येत आहे. या चकमकीतील मृतांच्या संख्येबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. परंतु काही वृत्तानुसार, पाकिस्तानी गोळीबारामुळे स्थानिकांची घरे उद्धवस्त झाली आहेत. ज्यामुळे अनेक नागरिकांना परिसरातून सुरक्षित स्थळाचा आसरा घ्यावा लागला. अनेक जण या चकमक होत असलेल्या भागातून पसार झाले.

**मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याचा दावा**

अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सदस्य कबीर हकमल म्हणाले, स्पिन बोल्डक भागात तालिबान आणि पाकिस्तानी सैन्यात भयंकर चकमकी सुरू झाल्या आहेत. काही सूत्रांनुसार, यात मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. अनेक स्थानिक घरे उद्धवस्त झाल्याचे वृत्त आहे. पाकिस्तानी सैन्य ड्युरंद रेषेवरील भागांना लक्ष्य करत आहेत. परंतु, अद्याप दोन्ही बाजूंनी कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होणे झाले सुरू

## दिवाळीपूर्वी जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जातील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५सोलापूर**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज सोलापूर येथे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत कधीपर्यंत मिळणार याबद्दल भाष्य केले. फडणवीस म्हणाले की, ज्या-ज्या वेळी शेतकरी अडचणीत असतो, त्या-त्या वेळी आमचं सरकार शेतकर्यांच्या पाठीशी उभे असते. मला हे सांगताना आनंद वाटतो की, शेवटी शेतकऱ्यांचं जे नुकसान होतं, त्याला जो मानसिक आणि आर्थिक त्रास होतो हा आपण कधीच सगळा भरून काढू शकत नाहीत. पण महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठं पॅकेज आपण यावर्षी दिले. ३२ हजार कोटी रुपये आपण शेतकऱ्यांना दिले. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जाणं सुरू



झालं. दिवाळीपूर्वी जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जातील. काहींना थोडे उशिराही मिळतील. आमचा प्रयत्न आहे की या महिन्यात ते शेतकऱ्यांच्या खात्यात गेले पाहिजेत.

शेतकरी संकटात असताना त्याचे राजकारण केले जात असल्याबद्दलही फडणवीस यांनी वक्तव्य केले आहे. ते म्हणाले की, मला कधीकधी आश्चर्य वाटतं की, आपत्ती असताना देखील काही लोकं राजकारण करतात. काही लोकांच्या डोक्यात इतका किडा गेला आहे सोलापूरमध्ये तर मला एक विधान पाहायला मिळाले. मला हसावं की रडावं लक्षात नाही. कारण इथल्या एका नेत्याने सांगितलं, म्हणाले सोलापूरमध्ये इतका जो पाऊस आला हा निसर्गामुळे नाही आला, हा राज्य सरकारने आणला. हा महापूर राज्य सरकारने आणला. काही हरकत नाही. त्यांना एक फूल द्या आणि गेट वेल सून सांगा. कधीकधी असा मानसिक परिणाम होतो. मी त्यांच्यासह सर्वांना एकच गोष्ट सांगतो की हे सरकार कितीही आपत्ती आली तरी शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिल, असे देवेंद्र फडणीस म्हणाले.

# ...तर अजून सहा महिने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नका, राज ठाकरेंचा निवडणूक आयोगाला सल्ला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी व मंगळवारी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी व निवडणूक आयुक्तांची भेट घेतली. या भेटीवेळी त्यांनी मतदार याद्यांमधील घोळाचा मुद्दा निवडणूक आयोगासमोर उपस्थित केला. तसेच राज ठाकरे अधिकाऱ्यांना म्हणाले, मतदार याद्यांमधील घोळ दुरुस्त होईपर्यंत निवडणुका घेऊ नका. त्यासाठी सहा महिने थांबावं लागलं तरी थांबू. परंतु, निवडणुका या पारदर्शक व निष्पक्षपणे पार पडल्या पाहिजेत.

राज ठाकरे म्हणाले, माझ्याकडे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधीची एक मतदार यादी आहे. या यादीमधील काही नावं मी तुम्हाला वाचून दाखवणार आहे ती वाचल्यावर तुमच्या लक्षात येईल की मतदार यादीत नेमका कसला घोळ आहे. काही लोकांच्या पालकाचं वय त्यांच्यापेक्षा कमी आहे, तर काही ठिकाणी एकाच घरात शेकडो सदस्य आहेत.

# काँग्रेसने आपल्याच नेत्यांना प्रश्न विचारावेत!

## मनपा जागा बळकवणारा कंपू कोणाचा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती महानगरपालिका इमारत नेहरू मैदानात बांधून महानगरपालिकेच्या मूळ जागेवर व्यापारी संकुल बांधण्यात येणार असल्याच्या निर्णयाचे वृत्त प्रकाशित झाल्यावर भाजपाचे खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मैदाने वाचवण्यात यावी ही भाजपाची अधिकृत भूमिका जाहीर केली. दुसऱ्याच दिवशी जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नेहरू मैदानात कुठलेही बांधकाम होणार नाही अशी भूमिकाच नव्हे तर ठोस निर्णय जाहीर केला. या विषयाला धरून काँग्रेसने केविलवाणी आदळआपट थांबवावी असा सल्ला भाजपाचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी काँग्रेसला दिला आहे.'फेक नरेटिव्ह' पसरवण्याचा रोग राहुल गांधी यांना जडला आहे. त्या विकृत रोगाची लागण अमरावती शहर काँग्रेसला लागल्याचे दिसून येत आहे. भाजपावर आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सल्ले



देणारे व पत्रपरिषदेत दिसलेले बहुतांश चेहरे आगामी मनपा निवडणुकीत पराभवाचे सावट दिसू लागताच कालपर्यंत 'कोणी तिकीट देता का तिकीट' करत दारोदार फिरत होते. सगळ्यांनी दरवाजे बंद ठेवल्यावर पुन्हा परत त्यांच्या डुबत्या जहाजात त्यांना नाईलाजाने बसावे लागते आहे.भाजपाने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाच प्रश्न विचारावा, असे काँग्रेसने म्हटले आहे. पालकमंत्र्याना प्रश्न विचारण्याची गरजच नाही. या प्रकरणी पालकमंत्र्यांची व भाजपाची भूमिका स्पष्ट आहे. उलट पत्रकार परिषदेत दिसलेल्या चेहऱ्यांनी आपल्याच नेत्यांना प्रश्न विचारावे. या प्रश्नांची उत्तरे जनहितासाठी आवश्यक आहेत. नेहरू मैदानावर कचऱ्याचा ढीग लावणारा अमरावतीचा कचरा सम्राट कोण ? या कचरा सेठ वर कोणाची कृपा आहे, कोणाचा वरदहस्त आहे ? मनपाच्या ताब्यातील जागांवर व्यापारी संकुल बांधून डल्ला मारणारा कंपू शहरात कोण चालवतो ? या भूमाफिया कंपूला कोणाचा आशीर्वाद आहे ? मनपाच्या मालकीच्या जनहितासाठी बांधलेल्या वास्तूंवर कोणाची कमाई सुरू आहे ? नेहरू मैदानावर इमारत बांधावी यासाठी छुपेपणाने कामाला लागलेला कंपू कोणाचा ? कचरा वहनाच्या नव्या कंत्राटा वर काँग्रेसचा आरोप कोणाचे हित साधण्यासाठी ? अशी असंख्य प्रश्नांची मालिका आहे.एकीकडे कचरा सम्राट, मनपा जागांवर डल्लामारू भूमाफिया कंपू पोसायचा आणि दुसरीकडे जिवाच्या आकांताने शहर वाचवा, शहर वाचवा ओरोळ्या स्वतःच मारायच्या असा काँग्रेसचा दुटप्पी चेहरा आहे. परिणामी आम्हाला प्रश्न विचारण्याचा सल्ला देण्यापेक्षा काँग्रेसने आपल्या नेत्यांना प्रश्न विचारावे. वारंवार 'फेक नरेटिव्ह' कामी येत नसतो हे गेल्या विधानसभेच्या निकालानंतरही काँग्रेसला समजले नाही, याचे आश्चर्य आहे !विकासाच्या गोंडस नावाखाली अमरावती शहरातील मैदाने गिळंकृत करण्याच्या कृतीला भारतीय जनता पार्टीचा तीव्र विरोध आहे. नेहरु मैदानाचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता ते आणि शहरातील इतर मैदाने देखील कायम ठेवण्यात यावी, अशी भाजपाची स्पष्ट भूमिका आहे.भाजपाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेला भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, किरण पातूरकर, प्रा. रवींद्र खांडेकर, प्रामुख्याने उपस्थित होते.नेहरू मैदानाला ऐतिहासिक महत्व आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात याच मैदानात अमरावतीकरांनी स्वराज्याची शपथ घेतली होती. या मैदानाचे सौंदर्यीकरण व्हावे. इथे असलेली शाळेची इमारत 'हेरिटेज' आहे. त्या इमारतीला सजवून त्यावर विविध प्रकारचे लाईट्स सोडून त्या इमारतीत अमरावतीचा इतिहास दर्शवणारे संग्रहालय व्हावे. अमरावती शहराच्या मध्यभागी छोटे का असेना एकमेव मैदान शिल्लक आहे. त्या मैदानाशी अमरावतीकरांचे भावनिक नाते जुळले आहे. अतिशय दाट वस्तीच्या मुंबईसारख्या शहरात देखील मैदानांचे संवर्धन आणि जतन करण्यात येते. अमरावतीत देखील याचप्रकारचा विचार करण्यात यावा. नेहरु मैदान, दसरा मैदान, सायन्सकोर मैदान अशा सर्व मैदानांना ऐतिहासिक महत्व असून त्यांचे जतन करण्यात येणार अशा ठाम भूमिकेचा पुनरुच्चार भाजपाच्या वतीने करण्यात आला.

# मुख्यमंत्री म्हणतात, भूपतीचे आत्मसमर्पण हे हिंसक चळवळीच्या अंताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ गडचिरोली**

नक्षलवाद्यांचा पॉलिट ब्युरो, केंद्रीय समिती सदस्य भूपतीसह ६१ जणांचे आत्मसमर्पण हे दंडकारण्यातील हिंसक चळवळीच्या अंताच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. महाराष्ट्रातून नक्षलवाद लवकरच संपेल, मात्र आता खरा धोका शहरी नक्षलवादाचा आहे. ही लढाई 'शहरी नक्षलवाद विरुद्ध संविधान' अशी असून, यात विजय संविधानाचाच होईल, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोली येथे व्यक्त केला.

चार दशकांहून अधिक काळ दंडकारण्यात सक्रिय असलेला जहाल नक्षल नेता आणि पॉलिट ब्युरो सदस्य मल्लोझुला वेणुगोपाल उर्फ भूपती याने आपल्या ६० साथीदारांसह मंगळवारी गडचिरोली पोलिसांपुढे शस्त्रे ठेवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या ऐतिहासिक सोहळ्यात, नक्षलवादी गणवेशातील भूपतीने शस्त्र मुख्यमंत्र्यांकडे सोपवले आणि मुख्यमंत्र्यांनी त्याच्या हाती भारतीय संविधान देऊन लोकशाहीच्या प्रवाहात त्याचे स्वागत केले.

देशाच्या इतिहासात प्रथमच पॉलिट ब्युरो सदस्यासह इतक्या मोठ्या संख्येने नक्षलवाद्यांनी एकत्र आत्मसमर्पण केल्याने चळवळीला मोठा हादरा बसला आहे. पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू आलाम सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रातिनिधिक स्वरूपात २० नक्षलवाद्यांचे स्वागत केले.


सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा
8605948853

# तामिळनाडू सरकार हिंदीवर बंदी घालणारे विधेयक आणणार

## हिंदी गाणी आणि होर्डिंग्जवरही बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५चेन्नई**

मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील तामिळनाडूतील द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) सरकार आज (१५ ऑक्टोबर) राज्य विधानसभेत हिंदी भाषेच्या वापरावर बंदी घालणारे विधेयक सादर करण्याची अपेक्षा आहे. सरकारचा संपूर्ण तामिळनाडूमध्ये हिंदी होर्डिंग्ज, बोर्ड, चित्रपट आणि गाण्यांवर बंदी घालण्याचा मानस आहे. सरकारने मंगळवारी रात्री कायदेतज्ज्ञांसह आपत्कालीन बैठक बोलावली आणि या विधेयकावर चर्चा केली. तामिळनाडू विधानसभेचे विशेष



अधिवेशन काल१४ ऑक्टोबर रोजी सुरू झाले आणि १७ ऑक्टोबर रोजी संपेल. पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज देखील सादर होण्याची अपेक्षा आहे.

राज्यात हिंदी भाषेच्या वापरावरून तामिळनाडूतील स्टॅलिन सरकार आणि केंद्र सरकारमध्ये दीर्घकाळापासून वाद सुरू आहे. या वर्षी मार्चमध्ये, मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाच्या चिन्हातून रुपया चिन्ह '' ऐवजी तमिळ तमिळ भाषेतील रुपयाचे प्रतिनिधित्व करणारा तमिळ शब्द 'रुबाई' चे पहिले अक्षर टाकलं आहे. सीएम स्टॅलिन हे केंद्र सरकारच्या तीन भाषा धोरणाला विरोध करत आहेत. त्यांनी भाजपवर राज्यातील लोकांवर हिंदी लादल्याचा आरोप वारंवार केला आहे. त्यांनी म्हटले आहे की राज्याच्या द्विभाषिक धोरणामुळे (तमिळ आणि इंग्रजी) शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराला फायदा झाला आहे.

# निवडणुक आयोगाकडे विरोधकांच्या चकरा म्हणजे 'फियास्को', देवेंद्र फडणवीस यांची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ मुंबई**

दुबार मतदान आणि मतदार यादीतील घोळ या मुद्द्यांवर बोट ठेवत विरोधकांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. मात्र समाधान कारक उत्तर न मिळाल्याने आज पुन्हा विरोधकांचे शिष्टमंडळ निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले. मात्र कोणत्या विषयाची तक्रार कोणाकडे हे माहिती नाही, कायदा काय आहे हे माहिती नाही, कोणत्या निवडणुका कोणत्या निवडणुक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली चालतात हेही माहिती नसलेले विरोधक मागील दोन दिवसापासून मतदारयाद्याबाबत शंका उपस्थित करणारे विरोध म्हणजे 'फियास्को' आहेत अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मुख्यमंत्री म्हणाले की, इतके कन्फुजक विरोधक माझ्या जीवनात पाहिले नाही. कोणाकडे गेलं पाहिजे, कायदा काय आहे



या गोष्टी विरोधकांना माहिती नाहीत. केवळ परचेप्शन क्रिएट करण्याकरिता म्हणजेच निवडणुकीत आपण हरलो त्यापूर्वीच ते परचेप्शन क्रिएट करताहेत. विरोधक काल राज्याचे निवडणूक अधिकारी आहेत त्या चोक्कलिंगम यांच्याकडे गेले होते. चोक्कलिंगम यांच्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे काहीच नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी वेगळे निवडणुक निर्णय अधिकारी आहेत. निवडणुक यादी अंतिम करण्यापूर्वी हरकती मागविल्या जातात, ज्यांच्याकडे पुरावे आहेत त्यांनी जायायला पाहिजं होतं, तेव्हाच तक्रार करायला हवी होती, मात्र तेव्हा तक्रार, हरकत न घेता आता काही तरी नरेटिव्ह पसरविण्यासाठी विरोधकांकडून मतदार याद्यात घोळ असल्याचे पुढे केलं जात आहे हे हास्यास्पद आहे. विरोधकांचे हे हास्यास्पद गोष्टी समोर येत असल्यानेच आज शरद पवार हे त्यांच्यासोबत गेले नसल्याचेही फडणवीस म्हणाले.

संपादकीय ......

# काँग्रेसला आणखी एका ठाकरेंचे ओझे नकोय

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन भावांच्या गाठीभेटी वाढत असल्यामुळे एका बाजूला आनंदाला उधाण आलेले आहे. त्याच वेळी उद्धव ठाकरे ज्या महाविकास आघाडीत आहेत, त्यातील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसने राज ठाकरेंच्या मविआमधील समावेशाबाबत अनुत्सुकता दर्शविलेली आहे. त्यामुळे ठाकरे बंधू कुठल्या फॉर्म्युल्याच्या आधारे एकत्र येणार याबद्दल उत्सुकता वाढलेली आहे. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे प्रादेशिक नेत्यांचे आणि पक्षांचे महत्त्व त्यांना वाढू द्यायचे नसते, आधीच उद्धव ठाकरे यांच्या प्रभावामुळे वाकलेली काँग्रेस आणखी एका ठाकरेंना समाविष्ट करून अधिक अवघडून जाऊ इच्छित नसावी, त्यामुळेच त्यांनी आता स्वबळाची भाषा केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यातील गाठीभेटी वाढू लागल्यावर सगळ्यात जास्त कुणाची चिंता वाढली असेल तर ती काँग्रेसची. त्यामुळे काही दिवसांपूर्वी काँग्रसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगून टाकले की, महाविकास आघाडीत चौथ्या भागीदाराची आम्हाला गरज नाही. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या गाठीभेटीमुळे रंगात आलेल्या वातावरणामध्ये मिठाचा खडा पडला. दोन्ही भावांनी एकत्र यावे यासाठी उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत जोरदार फिल्डिंग लावत आहेत. काही वेळा दोन्ही भावांनी पडद्यामागे एकत्र येऊन निवडणुका लढवण्याचे निश्चित केले असून ते सगळ्यांच्या समोर अचानक येतील आणि आश्चर्याचा धक्का देतील, जे महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल, अशी विधाने ते सातत्याने करत आहेत. काही वेळा ते काल्पनिक विधाने करून गोत्यात येत आहेत, पण त्यांचा आशावाद अखंड आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे हिंदी सक्तीविरोधात मराठीच्या मुद्द्यावर ५ जुलैला वरळी डोममध्ये एकत्र आले. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे जाहीर केले. त्यानंतर तर संजय राऊत यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यानंतर गणपतीपासून दोन्ही ठाकरे बंधू एकमेकांच्या घरी जाऊ लागले.

कौटुंबिक भेटीगाठी होऊ लागल्या. त्यामुळे संजय राऊत यांचा आत्मविश्वास अधिक वाढला. पण त्यांना हे माहीत आहे की, सध्या जरी ते महाविकास आघाडीत सोबत असले तरी त्यांचा क्रमांक एकचा शत्रू हा काँग्रेस होता. त्यामुळे एकवेळ शरद पवारांना मॅनेज करता येईल, पण काँग्रेसला मॅनेज करणे सोपे नाही. त्यामुळे काँग्रेसला खूश करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला सोबत घेणे गरजेचे आहे, अशी राज ठाकरे यांची भूमिका आहे, असे त्यांनी परस्पर जाहीर करून टाकले. याविषयी मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि बाळा नांदगावकर यांनी, आमच्या पक्षाची भूमिका आमच्या पक्षाचे नेते राजसाहेब ठाकरे किंवा पक्षाचे प्रवक्ते मांडतील, असे स्पष्ट केले. थोडक्यात, आमची भूमिका मांडण्याचा अधिकार संजय राऊत यांना नाही, असेच त्यांना सांगायचे होते. राऊतांच्या विधानाने काँग्रेस नेतेही अचंबित झाले. त्यानंतर सारवासारव करत काँग्रेसचे निर्णय हे राज्यात होत नसतात तर दिल्लीत होतात, असे राऊत यांनी सांगितले. त्यानंतर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी मनसेला महाविकास आघाडीत घेण्याविषयी आमचा काही विचार झालेला नाही. त्यामुळे संजय राऊत कितीही उत्साही असले आणि दोन्ही भावांच्या गाठीभेटी होत असल्या तरी महाविकास आघाडी राज ठाकरे यांना कसे सामावून घेणार हा मोठा प्रश्न आहे.

मुळात एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. जेव्हा २०१९ च्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपद देण्यास भाजपने नकार दिला आणि त्यांनी बाहेर पडून शरद पवारांसोबत हातमिळवणी केली. त्यानंतर शरद पवार यांनी महाविकास आघाडीची स्थापना केली. त्यात त्यांनी काँग्रेसला येण्याचे आवाहन केले, कारण बहुमतासाठी काँग्रेसची गरज होती. पण जिथे शिवसेना आहे तिथे आम्ही येणार नाही, असे काँग्रेसने सांगून टाकले. पण मोदींना केंद्रीय पातळीवर थोपवता येत नसेल तर महाराष्ट्रातील भाजपची सत्ता घालवून त्यांची ताकद कमी करण्याची ही संधी आहे, असे पवारांनी काँग्रेसच्या प्रमुख नेत्या सोनिया गांधींना पटवून दिले. तेव्हा सोनिया गांधी तयार झाल्या, पण तरीही त्यांनी आपल्या राज्यातील नेत्यांना सत्तेत सहभागी न होता बाहेरून पाठिंबा द्या, असे सांगितले. काँग्रेस शिवसेनेपासून इतकी सावध भूमिका घेत होती. कारण काँग्रेसच्या मते शिवसेना हा प्रांतीयवादी पक्ष असल्यामुळे त्यांच्यासोबत गेल्यास आपल्याला इतर राज्यांमध्ये त्याचा धक्का बसेल. पण राज्यातील त्यांचे नेते म्हणाले की, आम्ही सत्तेच्या बाहेर राहिलो तरी पक्षाचे नुकसान होईल, कारण आम्हाला केवळ बघे बनून रहावे लागेल. त्यामुळे सत्तेत सहभागी होणे आवश्यक आहे, त्यामुळे सोनिया गांधी यांनी परवानगी दिली. त्यामुळे महाविकास आघाडीत काँग्रेस सहभागी झाली आणि या तीन पक्षांची सत्ता राज्यात आली. हातातोंडाशी आलेली सत्ता भाजपला गमवावी लागली.

महाराष्ट्रात मागील वर्षी विधानसभा निवडणूक झाली, त्याअगोदर महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव जाहीर करण्यात यावे, असे जोरदार लॉबिंग संजय राऊत करत होते, पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीने तसे काहीही मान्य केले नाही. उलट, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला आलेले यश पाहून महाविकास आघाडीचा पुढील मुख्यमंत्री काँग्रेसचा असेल असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण आणि बाळासाहेब थोरात यांनी जाहीर करून

# रब्बीत सिंचनाची सोय नाही, कमी पाण्यात चांगलं उत्पन्न देणारी 'ही' पिके घ्या!

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक** : रब्बी हंगामात गहू, बार्ली, मोहरी आणि बटाटे यांसह इतर डाळींची पिके घेतली जातात. यातील काही पिके ही पाण्याच्या सोयीनुसार घेतली जातात. म्हणजे पाण्याची उपलब्धता असेल तरच गव्हाचे पीक घेतले जाते. पण काही शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा नसते, अशावेळी कमी पाण्यात शेती करण्यावर भर देणे आवश्यक ठरते.

म्हणूनच रब्बी हंगामात अशी कुठली पिके घेता येतील, जी कमी पाण्यात पिकवता येतील, शिवाय त्या पिकातून उत्पन्नही चांगले मिळेल. तर यामध्ये हरभरा, जवस, मसूर, वाटाणा, जवस इत्यादी पिके घेतली जाऊ शकतात. या पिकांबद्दल थोडक्यात माहिती घेऊयात....




**हरभरा–** हरभरा हे एक कडधान्य पीक आहे आणि रब्बी हंगामातील मुख्य पीक आहे. हरभरा हे व्यावसायिक पीक देखील मानले जाते. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की या पिकाला वाढण्यासाठी जास्त पाण्याची आवश्यकता नाही. हरभरा फक्त एक किंवा दोन सिंचनांनी काढता येतो. पेरणी करताना आणि फुलोऱ्याच्या वेळी एकदा पाणी दिल्यास चांगले पीक मिळते.

**मसूर आणि वाटाणे–** मसूर आणि वाटाणे ही देखील डाळींची पिके आहेत आणि रब्बी हंगामात घेतली जातात. जर तुमच्या शेतात पाणी साचत नसेल आणि नद्या किंवा कालव्यांना पाणी राहत नसेल तरीही, तुम्ही ही पिके घेऊ शकता. एक किंवा दोन सिंचन पुरेसे मानले जातात. हिवाळ्यात अनेकदा हलक्या स्वरूपाचा पाऊस येतो, हा पाऊस देखील या पिकांसाठी फायदेशीर ठरतो.

**जवस–** जवस हे रब्बी हंगामात घेतले जाणारे सर्वात महत्वाचे पीक आहे. हे तेलबियांचे पीक आहे आणि नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पेरले जाते. जवस हे देखील तुलनेने सोपे पीक आहे आणि त्याला जास्त पाण्याची आवश्यकता नाही. पिकाच्या परिपक्वतेसाठी जमिनीतील हलकीशी ओलही पुरेशी असते.

हे लक्षात घेतले पाहिजे की, रब्बी पिके हिवाळ्याच्या हंगामात घेतली जातात. हिवाळ्यात, रात्री थंड असतात, ज्यामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होते. शिवाय, हिवाळ्याच्या हंगामात सूर्य तितका तीव्र नसतो, त्यामुळे झाडे सुकण्याची शक्यता कमी असते. हे लक्षात घेतले पाहिजे की वर उल्लेख केलेली पिके मर्यादित पाणी असलेल्या क्षेत्रांसाठी सर्वोत्तम आहेत.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

आरोग्य संपदा आहार विशेष

## भरपूर प्रोटीन्स देणारे ६ शाकाहारी पदार्थ तुमच्या किचनमध्येच आहेत, घ्या प्रोटीन्सचा स्वस्तात मस्त डोस

दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक २

शाकाहारी लोकांच्या शरीरात प्रोटीन्सची कमतरता असते. ती भरून काढण्यासाठी अनेकजण बाजारात विकत मिळणारे प्रोटीन शेक पितात. पण त्या महागड्या पावडरवर पैसे खर्च करण्यापेक्षा आपल्या स्वयंपाक घरातलेच काही पदार्थ आपण नियमितपणे खाल्ले तर प्रोटीन्सची कमतरता निश्चितच भरून निघू शकते.



ते पदार्थ कोणते याची माहिती डॉक्टरांनी वीलहरसूशीहर्ज्ञीश्रज्ञरीपळ या इंस्टाग्राम पेजवर शेअर केली असून त्यापैकी काही पदार्थ तर अगदी रोजच आपल्या स्वयंपाक घरात असतात.

त्यापैकी पहिला पदार्थ म्हणजे शेंगदाणा. शेंगदाण्यामध्ये प्रोटीन्स आणि गूड फॅट्स चांगल्या प्रमाणात असतात. रोज सकाळी भिजवलेले शेंगदाणे खाल्ले तर त्यातून चांगले प्रोटीन्स मिळतात.

हिरव्या वाटाण्यांमधूनही चांगल्या प्रमाणात प्रोटीन मिळतं. त्यामुळे जेव्हा सिझन असेल तेव्हा हिरवे वाटाणे भरपूर खा. आणि नंतर ते फ्रोजन करूनही तुम्ही खाऊ शकता.

टोफूमधूनही चांगल्या प्रमाणात प्रोटीन्स मिळतात. तुमच्या भागात टोफू मिळत असेल तर पनीरऐवजी टोफू खाण्यास प्राधान्य द्या.

बदाम हा देखील प्रोटीन्सचा चांगला स्त्रोत आहे. रोज सकाळी ५ ते ६ भिजवलेले बदाम खायला हवेत.

बदामाप्रमाणेच अक्रोडमधूनही चांगल्या प्रमाणात प्रोटीन्स मिळतात. शिवाय त्यातून हेल्दी फॅटदेखील मिळतात.

घरी काढलेलं नारळाचं दूध जर वेगवेगळ्या पदार्थांमधून नियमितपणे घेतलं तर त्यातूनही गूड फॅट्स तसेच प्रोटीन्स चांगल्या प्रमाणात मिळतात.

# विभागीय लोकशाही दिनात १० प्रकरणांवर सुनावणी

## दाखल प्रकरणांवर तत्काळ कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करा– विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती –** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, पुढच्या लोकशाही दिनाच्या अगोदरच शेवटचे निराकरण करुन प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १० प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त रविंद्र हजारे, उपायुक्त संतोष कवडे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते. यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १० प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित



विभागप्रमुखांना केल्या.


विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे २ स्वीकृत अर्ज, ८ अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रारी) असे एकूण १० प्रकरणांवर लोकशाही दिनात चर्चा करण्यात आली. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत चार प्रकरणे दाखल झाली असून त्यावर कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली.यावेळी लोक शाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्रीमती सिंघल यांनी यावेळी केल्या.

# माहुली जहांगीर येथील आरोग्य तपासणी शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

## डॉ. राहुल बिजवे व डॉ. मीनल बिजवे यांनी केली रुग्णांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४माहुली जहागीर –** माहुली जहागीर येथे रविवार ५ ऑक्टोबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अर्मेश हॉस्पिटलचे संचालक प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. राहुल बिजवे व डॉ. मीनल बिजवे यांनी आपली सेवा देऊन रुग्णांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार केला आणि आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या शिबिराचा लाभ परिसरातील शेकडो नागरिकांनी घेत आपली मोफत आरोग्य तपासणी करून घेतली.माहुली जहागीर येथील मोर्शी रोड स्थित पावर हाऊस जवळील माँ भगवती बाग येथे सकाळी १० ते ४ या वेळात आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात रुग्णांची मोफत तपासणी करून बी एम डी,हिमोग्लोबिन, शुगर, बीपी, अशा विविध चाचण्या मोफत करण्यात आल्या .खापर्डे बगीच्या स्थित अर्मेश हॉस्पिटलचे संचालक प्रसिद्ध



अस्थिरोग तज्ञ डॉ. राहुल बिजवे आणि प्रसिद्ध हृदयविकार व मधुमेह तज्ञ डॉ. मीनल बिजवे यांनी शिबिरात आपली सेवा देत रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर औषध उपचार केला तसेच आरोग्य विषयी मार्गदर्शन देखील केले.सदर आरोग्य तपासणी शिबिरामध्ये परिसरातील शेकडो नागरिकांनी सहभागी होत आपली आरोग्य तपासणी करून घेतली सोबतच अंदाजे तीनशे रुग्णांना मोफत औषधीचे वाटप देखील डॉ. बिजवे यांच्याकडून करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बिजवे परिवारातील सदस्य तसेच अर्मेश हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

बॉक्स दर सोमवारी सेवा देणार : डॉ. बिजवेमाऊली जहागीर या गावासोबत माझे ऋणानुबंध जुळले असून येथील नागरिकांसोबत आपले सलोख्याचे संबंध आहेत. ग्रामीण भागातील लोकांना चांगली वैद्यकीय सेवा मिळावी या दृष्टिकोनातून व सामाजिक बांधिलकी जपत आपण दर सोमवारी माऊली जहागीर येथे नेहमीच सेवा देणार असल्याचे डॉक्टर राहुल बिजवे यांनी सांगितले.

# नांदगाव खंडेश्वर येथे बस डेपोची अभाविपची मागणी: तहसीलदारांना निवेदन सादर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१५नांदगाव खंडेश्वर–** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) नांदगाव खंडेश्वर शाखेने शहरात बस डेपो उभारण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.

नांदगाव खंडेश्वर हे नगरपंचायतीचे शहर तसेच तालुक्याचे मुख्यालय असूनही येथे अद्याप बसस्थानक उभारण्यात आलेले नाही. त्यामुळे बस थांबण्यासाठी कोणतीही नियोजित जागा उपलब्ध नाही.

बसस्थानक नसल्यामुळे विद्यार्थी, नागरिक आणि प्रवाशांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. बस निश्चित ठिकाणी थांबत नसल्याने प्रवाशांना धावपळ करावी लागते.




पावसाळ्यात भिजत उभे राहावे लागते, तर उन्हाळ्यात तीव्र उन्हाचा त्रास सहन करावा लागतो.

विद्यार्थ्यांना बसमध्ये चढ–उतार करताना रस्त्यावरच थांबावे लागते, ज्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. नांदगाव खंडेश्वर तालुका शैक्षणिकदृष्ट्या विकसित होत असल्याने येथे दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी प्रवास करतात. बस डेपो उभारल्यास विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

निवेदन सादर करतेवेळी नगरमंत्री ओम मोरे, अभिषेक पवार, सुमित नागपुरे, आनंद जयस्वाल, साहिल जांभुळकर, आदित्य गवळी, अभय राजूरकर आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेचे वेळापत्रक जाहिर ; ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती,**राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेकरिता (छचचड) ऑनलाईन शाळा नोंदणी व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य परिषदेच्या http://www.mscepune.in व https://www.mscenmms.in या संकेतस्थळावर भरण्याच्या वेळापत्रकानुसार मुदतवाढ देण्यात आली आहे, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

परीक्षेच्या वेळापत्रकाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे–नियमित शुल्कासह ऑनलाईन आवेदपत्रे दि. १२ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबरपर्यंत सादर करता येईल. विलंब व अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे भरण्याचा कालावधी दि. २२ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबरपर्यंत असेल.

दि. ३० ऑक्टोबरनंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असेही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेव्दारे कळविण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १५ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# राजकीय पक्षांचे दार चुकले; मतदार याद्यांचा विषय कक्षेत नाही

## राजकीय प्रतिनिधींना आयोगाचे उत्तर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई –** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीच्या मतदारयाद्यांचे स्वरूप कसे असावे यासंबंधी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी घेतलेल्या बैठकीत सूचना केल्या; पण, या याद्यांचे स्वरूप ठरविणे हे आमच्या कार्यकक्षेत येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले. त्यामुळे या प्रतिनिधींचा मागणी करण्याचा दरवाजा चुकला, असे चित्र समोर आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाणारी विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत नव्याने नावे समाविष्ट करणे किंवा नावे वगळण्याची कार्यवाही किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी बैठकीत केले.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या या बैठकीला राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणीही उपस्थित होते.

वाघमारे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लागू असलेल्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदारसंघाची यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांसाठी जशीच्या तशी वापरली जाते. त्यासाठी अधिसूचित दिनांक निश्चित केला जातो. त्यानुसार १ जुलै २०२५ रोजी असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणे मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात.

मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींबाबत दुरुस्त्यांबाबत हरकती व सूचना मतदार दाखल करू शकतात, असे वाघमारे यांनी सांगितले.

### प्रचारकांची संख्या ४०; खर्च मर्यादाही वाढविणार

प्रमुख प्रचारकांच्या संख्येत आणि उमेदवारांच्या निवडणूक खर्चात वाढ करण्याची मागणी विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी केली. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मान्यताप्राप्त पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांची संख्या २० वरून ४० करण्याबाबत विचार करण्यात येईल; तसेच उमेदवारांच्या निवडणूक खर्च वाढवण्याबाबत आयोग योग्य तो निर्णय घेईल, असे वाघमारे म्हणाले.

# २१ लाखांचा पोर्टिफाईड तांदूळ पकडला

## धान्याच्या अवैध वाहतुकीवर कारवाई, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील धान्याची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात नाटगावपेठ पोलिसांनी मंगळवारी (ता. १४) मोठी कारवाई केली. पोलिसांनी पोर्टिफाईड तांदळाने भरलेला ट्रक पकडत तब्बल २१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या धाडसी कारवाईने धान्य तस्करी करणाऱ्या किट्समध्ये एकचखळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांना एका ट्रकमधून पोर्टिफाईड तांदळाची अवैधरीत्या वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ जिल्हा पुरवठा अधिकारी,अमरावती ग्रामीण यांना कळवून संयुक्तरीत्या पाहणी केली. पंचासमक्ष पंचनामा करून २४० किंटल पोर्टिफाईडतांदूळ किंमत सुमारे ६ लाख रुपये आणि ट्रक (एमएच-३० बीडी-१५९९, किंमत सुमारे १५ लाख रुपये) असा एकूण २१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहनचालक शिवशंकर ओंकार तायडे (रा. अकोला) आणि हमाल राजेश सोनोने (रा. अकोला) यांनी चौकशीत हा तांदूळ अमोल महल्ले (रा. भातकुली) यांच्या गोदामातून घेऊन वडसा (जि. गडचिरोली) येथे नेत असल्याचे सांगितले. त्यांच्याजवळ 'बालाजी ट्रेडर्स'चे बिल सापडले. प्राथमिक चौकशीत संबंधित तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील असल्याचा संशय बळावल्यामुळे प्रकरणातील मुख्य सूत्रधार अमोल महल्ले, शिवशंकर तायडे आणि राजेश सोनोने यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत नांदगाव पेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.ही. कारवाई पुरवठा विभाग व नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या पथकाने संयुक्तपणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत निरीक्षक. अधिकारी चैताली यादव, हवालदार राजाभाऊ राऊत, राजीक खान, निलेश साविकार, राजा सय्यद, वैभव तिखीले आणि अमित ढोले यांनी सहभाग घेतला.–

# महिला बचतगटांचा दिवाळी फराळ, खाद्यान्ने खरेदी करुन प्रोत्साहन द्यावे-संजिता महोपात्र

## मेळघाट हाट येथे भव्य विक्री व प्रदर्शन मेळावा १९ ऑक्टोबरपर्यंत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती–**

:महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या वतीने दिवाळी महोत्सवानिमित्त 'मेळघाट हाट', सायन्सस्कोर मैदान येथे भरविण्यात आलेल्या भव्य विक्री व प्रदर्शन मेळाव्याचे उद्घाटन आज मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महोपात्र यांच्या हस्ते झाले.

महिला बचत गटांनी तयार केलेला दिवाळी फराळ, खाद्यान्ने खरेदी करुन त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन श्रीमती संजीता महोपात्र यांनी केले. महा एफ.पी.सी.संचालक सुधीर इंगळे, माविमचे विभागीय सल्लागार केशव पवार, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार पवन देशमुख, वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ. रंजन वानखेडे तसेच शासकीय कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

मेळाव्यात जिल्ह्यातील विविध महिला बचत गट यांच्याकडून हस्तनिर्मित उत्पादने, स्थानिक खाद्यपदार्थ, दिवाळी फराळ, सजावटीच्या वस्तू, कापड, सुगंधी अगरबत्ती, तसेच ग्रामीण भागातील पारंपरिक कलाकृती यांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

महिलांच्या कष्टातून आणि कौशल्यातून घडविलेल्या या वस्तूंना नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेकांनी आपल्या घरासाठी व दिवाळी भेटवस्तूसाठी महिला उद्योजिकांच्या उत्पादनांची खरेदी करून 'वोकल फॉर लोकल' या संकल्पनेला हातभार लावला आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत १९ ऑक्टोबरपर्यंत मेळघाट हाट येथे भरविण्यात आलेल्या या दिवाळी विशेष विक्री व प्रदर्शनास भेट देवून महिला उद्योजकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे. या माध्यमातून 'आत्मनिर्भर महिला – सशक्त समाज' हा संदेश दिला जाईल, असे आवाहन डॉ. रंजन वानखेडे यांनी केले आहे.

# उद्यापासून २१ ऑक्टोबरपर्यंत सांस्कृतिक भवनात दिवाळी आनंदोत्सव

## आयुक्तांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

## अमरावती महानगरपालिकेतर्फे दिवाळी आनंदोत्सवाचे आयोजन






**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती –** अमरावती महानगरपालिका आणि विधिमंत्र संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ ते २१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सांस्कृतिक भवन, अमरावती येथे दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.सहा दिवस चालणाऱ्या या उत्सवामध्ये फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शनी, हस्तकला व बचत गटांचे स्टॉल्स, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच स्थानिक कलाकारांचे सादरीकरण असे विविध आकर्षक उपक्रम ठेवण्यात आले आहेत. शहरातील नागरिक, विद्यार्थी, छायाचित्रकार, महिला बचत गट, व्यापारी व तरुणांसाठी हा उत्सव एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरणार आहे.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे, आणि या आनंदोत्सवाच्या माध्यमातून शहरातील नागरिक एकत्र येऊन संस्कृती, कला आणि सर्जनशीलतेचा उत्सव साजरा करतील. नागरिकांनी परिवारासह उपस्थित राहून या उपक्रमाला यशस्वी करावे, ही मनापासून विनंती आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटन १६ ऑक्टोबर रोजी दुपारी भव्य सोहळ्यात होणार असून, २१ ऑक्टोबर रोजी समारोप आणि विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.अमरावती महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना या दिवाळी आनंदोत्सवात सहभागी होण्याचे आणि शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# येवद्याच्या दिव्यांग सृष्टीची नृत्यकलेत भरारी: अडथळ्यांवर मात

## ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी ठरली प्रेरणादायी व्यक्तिमत्व



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ दर्यापूर–** जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आयुष्यातील सर्व अडथळ्यांवर मात करत आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारी येवदा येथील दिव्यांग (मूकबधीर) नर्तकी सृष्टी सविता प्रकाश तायडेने नृत्यकलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिव्यांग असूनही सृष्टीने आतापर्यंत ५० हून अधिक स्पर्धा व राज्यस्तरीय नृत्य स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवून भरारी घेत कलेचे वर्चस्व सिद्ध केले आहे.अमरावती येथील सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालयातील एम. ए. (योगशास्त्र) अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी असलेली सृष्टी तायडे नुकत्याच कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथे झालेल्या 'इंद्रधनुष्य-निवड फेरी २०२५-२०२६' स्पर्धेत कथ्थक नृत्य (सोलो) या प्रकारात प्रथम क्रमांकाची विजेती ठरली आहे. तिची निवड आता राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी (जळगाव) झाली आहे. कथ्थकमध्ये तिला गायनसाथ विवेक गावंडे यांनी केली. मुंबईच्या अंधेरी (पश्चिम) येथील प्रसिद्ध किंग्स अकॅडमीत तिने वेस्टर्न नृत्याचे प्रशिक्षण घेतले. शास्त्रीय नृत्याबरोबरच सृष्टीने बॉलिवूड, फोक, फ्युजन, चित्रपट गीते, रंगोली, मेहंदी, क्राफ्ट वर्क आणि डेकोरेशन यासारख्या विविध कलांमध्येही प्रावीण्य मिळवले आहे.सृष्टी तायडे ही कलासंस्कार अकादमी, दर्यापूर येथील कथ्थक गुरु अर्चना जितेश रापर्तीवर यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण घेत आहे. तिने यशाचे श्रेय कुटुंबीयांसह गुरु अर्चना व जितेश रापर्तीवर यांना दिले आहे.सेंट थॉमस कॉलेज अमरावतीचे अध्यक्ष डॉ. सिकंदर मनवरे, प्राचार्या संजीवनी मनवरे, प्रा. प्रणय मनवरे, प्रा.स्वप्निल ईखार, प्रा. शांता गाडगे, प्रा. सुमेध गावंडे, प्रा. शिल्पा गजभिये, प्रा. कल्पना राऊत तसेच कर्मचारी पंकज गजभिये व आकाश मेश्राम यांनी तिचा सत्कार केला.

गोव्यातील आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेतही प्रथम गोव्यात आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेतही तिने पहिला क्रमांक पटकावला. डान्स इंडिया डान्स फेम वैभव घुगे यांनी तिला सन्मानचिन्ह प्रदान केले. लावणी किंग आशिष पाटील, नृत्यदिग्दर्शक देवेश मिरचंदानी यांच्या कार्यशाळेतून सृष्टीला नृत्याचे धडे मिळाले. नागपूरच्या ब्युटी कॉन्टेस्टमध्ये तिला अभिनेत्री किशोरी शहाणे यांच्या हस्ते बेस्ट डान्सर पुरस्काराने गौरवले. सध्या सृष्टीचा योगासनातील आर्टिस्टिक आणि ऱ्हीदमिक प्रकाराच्या एकत्रीकरणातून नवा नृत्य प्रकार निर्माण करण्याचा मानस आहे.

# धामणगाव पं.स. आरक्षण जाहीर: सभापतीपद महिलेसाठी राखीव:आठपैकी केवळ एका जागेवर कुणालाही संधी

## ४ खुल्या, २ नामाप्र, एकेक एससी, एसटीसाठी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ धामणगाव रेल्वे**धामणगाव रेल्वे: आगामी पंचायत समिती निवडणुकीसाठी आरक्षणाची सोडत जाहीर झाली आहे. यामध्ये सभापतीपद महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले असून, आठपैकी केवळ एकाच जागेवर कोणत्याही संवर्गातील उमेदवाराला निवडणूक लढवण्याची संधी मिळणार आहे. उर्वरित जागा विविध प्रवर्गांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

एकूण आठ जागांपैकी चार जागा खुल्या प्रवर्गासाठी आहेत, तर दोन जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) आणि प्रत्येकी एक जागा अनुसूचित जाती (एससी) व अनुसूचित जमाती (एसटी) साठी राखीव आहे. खुल्या प्रवर्गातील चारपैकी अंजनसिंगी, पिंपळखुटा आणि तळेगाव दशासर या तीन जागा महिलांसाठी आरक्षित झाल्या आहेत. त्यामुळे चिंचोली ही एकमेव जागा अशी आहे, जिथे कोणत्याही संवर्गातील पुरुष किंवा महिला उमेदवार निवडणूक लढवू शकतील.


नामाप्रसाठी राखीव असलेल्या दोन जागांमध्ये निंभोरा-बोडखा आणि मंगरुळ दस्तगीर यांचा समावेश आहे. यापैकी मंगरुळ दस्तगीरची जागा महिलेसाठी राखीव असल्याने तेथे पुरुष उमेदवाराला संधी मिळणार नाही. अनुसूचित जातीसाठी जुना धामणगाव, तर अनुसूचित जमातीसाठी शेंदुरजनाखुर्द हे मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले आहेत. या दोन्ही जागांवर पुरुष आणि महिला असे दोन्ही उमेदवार निवडणूक लढवू शकतील.

तहसीलदार आशिष घोरपडे यांच्या उपस्थितीत सोमवारी आठ गणांची आरक्षण सोडत काढण्यात आली. या आरक्षणामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर काही जणांना निवडणूक लढवता येणार नसल्याने त्यांना नव्या संधी शोधाव्या लागणार आहेत. महिलांना मिळालेल्या या मोठ्या संधीमुळे अनेक नवीन चेहरे राजकारणात सक्रिय होण्याची शक्यता आहे. दोन वर्षांच्या शांततेनंतर धामणगाव तालुक्याचे राजकीय वातावरण ढवळून निघाले असून, आगामी काळात प्रचाराचा धुरळा उडताना दिसणार आहे.दरम्यान, धामणगाव तालुक्यात जिल्हा परिषदेचे चार मतदारसंघ आहेत आणि हे चारही मतदारसंघ महिलांसाठी राखीव झाले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेत या तालुक्यातून शंभर टक्के महिलांचे प्रतिनिधित्व असेल. जुना धामणगाव, मंगरुळ दस्तगीर, तळेगाव दशासर आणि चिंचोली हे ते चार मतदारसंघ आहेत. यापैकी चिंचोली हा खुला असल्याने तेथे कोणत्याही जाती-जमातीच्या महिलेला निवडणूक लढवता येईल, तर उर्वरित तीन मतदारसंघात केवळ नामाप्र संवर्गातील महिलांना निवडणुकीत उभे राहता येणार आहे.

# कचरा संकलनासाठी करार प्रक्रियेला गती प्री-बिड बैठकीत सहा कंपन्यांची उपस्थिती

## स्वच्छता आणि कचरा संकलनाचा करार २५० कोटींचा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती** मनपा ने अमरावती शहराची स्वच्छता, कचरा गोळा करणे आणि तो कंपोस्ट डेपोमध्ये नेणे तसेच घनकचरा व्यवस्थापन या कामांसाठी निविदा प्रसिद्ध केली. सहा कंपन्यांनी महानगरपालिकेशी संपर्क साधून मंगळवारी ऑनलाइन झालेल्या प्रीपेडमध्ये सहभाग नोंदवला. प्रकाशित निविदेतील त्रुटींबाबत संबंधित कंपन्यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांवर चर्चा करण्यात आली.स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा कंत्राट आहे. जकातनंतरचा हा सर्वात मोठा करार ठरण्याची शक्यता आहे. ज्याची अंदाजे किंमत २४० ते २५० कोटी रुपये आहे. एक तास चाललेल्या बैठकीत निविदेतील त्रुटींवर चर्चा करण्यात आली. या करारानुसार, कंपनीला अमरावती शहरातील विविध निवासी क्षेत्रांची स्वच्छता करावी लागेल, या भागातील कचरा गोळा करावा लागेल आणि सुकळी आणि अकोली भागातील कंपोस्ट डेपोमध्ये पोहोचवा लागेल. कंपोस्ट डेपोमधील घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि व्यवस्थापन करण्याची जबाबदारीही कंपनीची असेल.९ महानगरपालिके ने ऑक्टोबरला निविदा सूचना प्रकाशित केली. त्यानंतर, सहा प्रमुख कंपन्यांनी या कामासाठी प्रस्ताव सादर केले, ज्यात पूजा कन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा), अर्बन एन्व्हायरो प्रायव्हेट लिमिटेड (नागपूर), कोणार्क इन्फ्रा (मुंबई), पी. रेड्डी (हैदराबाद), फार्मर असोसिएट्स (ठाणे) आणि मुझफ्फरपुरा (बिहार) येथील कंपन्यांचा त्यात समावेश आहे. यापैकी पूजा कन्स्ट्रक्शन कंपनी गेल्या १५ वर्षांपासून अमरावती महानगरपालिका क्षेत्रात कचरा वाहतूक हाताळत आहे.



नागपूरमधील अर्बन एन्व्हायरोप्रायव्हेट लिमिटेड नागपूरमध्ये कचरा संकलन व वाहतूक हाताळत आहे. मुंबईतील कोणार्क इन्फ्रा ही नवी मुंबईतील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत आहे. हैदराबादमधील पी. रेड्डी कंपनी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगरसह हैदराबाद (तेलंगणा) येथे स्वच्छतेचे काम हाताळत आहे. शिवाय, ठाणे येथील फार्मर असोसिएट्स मुंबईत स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापन हाताळत आहे. बिहारमधील मुझफ्फरपूर येथील कंपनीचे नाव आणि तपशीलवार माहिती अद्याप जाहीर केलेली नाही. प्रत्येक कंपनी कामात कुशल असल्याचे सांगितले जात आहे. महानगर पालिकेच्या इतिहासातील सर्वात मोठ्या या करारासाठी मोठी स्पर्धा होण्याची चिन्हे आहेत. महानगरपालिका प्रशासनाने मंगळवारी (ता.१४) इच्छुक कंत्राटदारांसोबत बोलीपूर्व बैठक बोलावली. ही बैठक सुमारे एक तास चालली. इच्छुक कंत्राटदारांनी निविदा सूचनेतील त्रुटी निर्दशनास आणून दिल्या आणि महानगरपालिकेने स्वतःहून काही मुद्दे उपस्थित केले. मनपा आयुक्तांनी सांगितले की, हा करार 'संयुक्त उपक्रम' नसेल, तर कंत्राट मिळवणाऱ्या बोलीदाराला शहर स्वच्छ करावे लागेल आणि विविध निवासी भागातून निर्माण होणारा कचरा गोळा करावा लागेल आणि तो त्याच्या वाहनांद्वारे अकोली आणि सुकळी संकुलातील कंपोस्ट डेपोमध्ये पोहोचवावा लागेल, यासोबतच त्यांनी अटी शर्ती ठेवल्या.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोमवारी (ता. १३) अमरावती येथे भाजपच्या विभागीय बैठकीसाठी आलेले असताना अमरावती विमानतळावर त्यांचे स्वागत करताना तुषार भारतीय....यावेळी खा. अनिल बोंडे, आ राजेश वानखडे, आ प्रवीण तायडे, आ. उमेश यावलकर, माजी मंत्री प्रवीण पोटे, माजी महापौर चेतन गावंडे, प्रशांत शेगोकार, किरणाताई महाले, निवेदिता चौधरी, जयंत डेहनकर, दिनेश सूर्यवंशी, शिकाय कुळकर्णी आदी उपस्थित होते.

# मोर्शी येथे पिसाळलेल्या कुत्र्याने तिघांना घेतला चावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मोर्शी–**
पिसाळलेल्या कुत्र्याने दोन विद्यार्थ्यांसह शिक्षिकेवर हल्ला करून त्यांना चावा घेतला. या तिन्ही जखमींना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.तालुक्यातील हिवरखेड जवळील बेलोना जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने इयत्ता पहिलीतील दोन विद्यार्थ्यांवर हल्ला करून चावा घेतला. विद्यार्थ्यांना स्वान चावत असल्याचे एका महिला शिक्षिकेला दिसले. त्यांनी कुत्र्याला हाकलण्याचा प्रयत्न केला. मात्र, पिसाळलेल्या



कुत्र्याने शिक्षिकेवर हल्ला करून चावा घेतला. ही घटना १० ऑक्टोबरला घडली होती.श्वानाने चावा घेतलेल्या विद्यार्थी व शिक्षिकेला नजीकच्या हिवरखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांनी औषध उपचार करून पुढील उपचारासाठी तीन ही रुग्णांना अमरावती येथील जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आली आहे. व पिसाळलेल्या कुत्र्याने गावात हौदोस घातला असून रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या दुचाकीस्वाराच्या मागे धावत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# फ्रेजरपुरा प्रशांत नगर नाला पूल परिसराची आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केली सविस्तर पाहणी

## नाल्यांची स्वच्छता व पाणी निचरा व्यवस्थापनावर भर; तातडीने उपाययोजना करण्याचे दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती–**
महानगर पालिका नागरिकांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज दिनांक १४ ऑक्टोंबर २०२५ रोजी पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक ११ मधील फ्रेजरपुरा परिसरातील प्रशांत नगर नाला पूल परिसराची पाहणी केली.या पाहणीदरम्यान परिसरातील नाल्यांची स्वच्छता, पावसाळ्यातील पाणी निचरा व्यवस्थापन, नागरिकांना होणाऱ्या अडचणी तसेच पूलाभोवतीच्या स्वच्छतेची स्थिती यांचा सखोल आढावा आयुक्तांनी घेतला. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, नाल्यांवरील झाकणांची स्थिती, आणि जलनिकासी अडथळ्यांचे निरीक्षण करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती दुरुस्ती आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.सर्व अधिकाऱ्यांना आयुक्तांनी परिसरातील कामांबाबत जबाबदारीने व समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश दिले.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी सांगितले की, महानगरपालिकेचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे. नाल्यांमधील गाळ काढणे, अतिक्रमण हटवणे आणि नियमित साफसफाई ठेवणे या गोष्टी वेळेवर केल्या गेल्यास पावसाळ्यात पाणी तुंबण्यासारख्या समस्या टाळता येतील.तसेच त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, नाल्यांमध्ये घनकचरा, प्लास्टिक व अन्य कचरा टाकू नये. परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले.महानगरपालिकेच्या या पाहणीमुळे संबंधित विभागांना कामकाज अधिक गतीने पार पाडण्यासाठी प्रेरणा मिळाली



असून, प्रशांत नगर परिसरातील स्वच्छता व जलनिस्सारणाची स्थिती सुधारण्यासाठी लवकरच ठोस उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत.या पाहणीदरम्यान झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, अभियंता नितीन भटकर, मंगेश कडू, स्वास्थ निरीक्षक शक्ती पिवाल, योगेश कंडारे आणि श्री. कुळकर्णी आदी अधिकारी उपस्थित होते.

# बसमधून २५० ग्रॅम दागिन्यांसह रोख लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**
मंगरुळपिरहून अमरावतीसाठी एसटी बसने प्रवास करणाऱ्या ६७ वर्षीय निवृत सहायक पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या बॅगमधील सोन्याच्या दागिन्यांचा डबा चोरट्यांनी लंपास केला. त्या उन्मात सोन्याचे २० ग्रॅम वजनाचे दानिने तसेच २२ हजार रुपये रोड व चांदीचे दागिने असा लाखांचा ऐवज लंपास झाला आहे. या प्रकरणी निवृत सहमक पसूक्ष्म विकास अधिका-यांनी बडनेरा पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ससोमवारी (दि. ७) रात्री चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. हरिदास रामकृष्ण सावके (१७, जि. वाशीम) असे तक्रारदार निवृत सहत्यक पशुष्म विकास अधिकानांचे अधिकानांचे नाव नाव आहे. हरिदास सायके ११ अंगिटोकाला दुराची पत्नीसह मंगरुळमीतून अमरावतीला एसटीने आले. त्यांनी सोबत असलेल्या मध्ये सोन्याचा हार, सोन्याचे कानातील जोड, बांगड्या, देन अंगठ्या, पेडल, मंगळसूत्र पोहे पाटल्या, सोनसाखळी, सोन्याचे कडे असे एकूमा २० ग्रॅम सोन्याचे दागिने ठेवले होते. या गोंबतच २२ हजार रूपये रोख तनेन चांदीला तोरख्या व चांदीच्या वाट्या असे एकूण ६०ग्राम वजनाची चांदी सुद्धा एका प्लास्टिकच्या ठेवली होती. हा डबा बैगमध्ये कपडयाच्या खाली होता. मंगरूळ वरून ही बस निघाली. त्यानंतर त्यानंतर साबळे दांपत्य शहरातील साईनगर बस स्टँडवर उतरले व तेथून सद् लेआऊटमध्ये नातेवाइकांच्या घरी गेले. त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांनी बॅगमधील दागिन्यांचा डबा पाहिला असता तो दिसला नाही. तसेच सोने, चांदीचे दानिने व दिसली नाही. त्यावेळी या सर्व मुद्देमालाची चोरी झाल्याचे साबके यांना लक्षात आले. त्यामुळे त्याचे बडनेरा पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# 'संघ म्हणजे राष्ट्रनिष्ठ व्यक्ती निर्माण करण्याचा कारखाना'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मोर्शी–** संघ म्हणजे राष्ट्रनिष्ठ व्यक्ती निर्माण करण्याचा कारखाना आहे. संधाने संघाची शाखा ही अभिनव कार्यपद्धती संघटनेने संपूर्ण जगाला दिली. भगव्या ध्वजाखाली एक तास एकत्र येऊन त्यामधून रोज संस्कार दिले जाते. देशभक्तीचे, समाज भक्तीचे भारत मातेला मोठे करण्यासाठी संस्कार मिळतात, असे उद्बोधन प्रमुख वक्ते म्हणून विभाग कार्यवाह डॉ. दत्तात्रय रत्नपारखी यांनी केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून रविवारी दुपारी ४ वाजता



रामजीबाबा संस्थानच्या पंजाबबाबा सभागृहापासून पथसंचलनाला सुरुवात करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.या पथसंचलनात शेकडो स्वयंसेवक काळी टोपी, पांढरा शर्ट, खाकी पैंट आणि हातात काठी असा गणवेश धारण करून पथसंचलनात सहभागी झाले होते. सूर्योदय चौक, गुजरी बाजार, गांधी चौक, प्रभात चौक, डॉ. आंबेकर चौक, मंत्री मार्केट, जयस्तंभ चौक, अमरावती रोड शिवाजी शाळा येथील मैदानावर विजयादशमी उत्सव व शस्त्र तू उपस्थित मान्यवरांचा हस्ते करण्यात आले. या वेळी स्व सेवकांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले महामंडळ तसेच गुरुदेव सेवा मंडळाच्या तालुका प्रचारक डॉ. प्रतिभा घाटोळ, मोर्शी तालुका संघचालक मनोहर घुल्क्षे उपस्थित होते. या पथसंचलनाचा सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पथसंचलनात सहभागी स्वयंसेवकावर विविध ठिकाणी फुलांचा वर्षाव करण्यात आला. प्रास्ताविक करून आभार अजय काळे यांनी मानले. यावेळी भारतीय किसान संघाचे सुरेश श्रीराव, सहकार भारतीचे संजय गारपवार उपस्थित होते.

# शंकरबाबा पापळकर यांच्या मानसकन्येचे खास डोहाळे जेवण

## विभागीय धर्मादाय आयुक्त कार्यालयाने साजरा केला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती :**
नियतीने जन्मतःच बेवारस आणि मूकबधिर म्हणून जीवनाच्या संघर्षात फेकलेल्या एका मुलीला शंकरबाबांनी वडील म्हणून नाव दिले. त्या वैशाली पापळकर यांना, तब्बल सात वर्षांच्या संसारानंतर मातृत्वाचे अनमोल वरदान मिळाले आहे. या भावनिक क्षणाचे औचित्य साधून विभागीय धर्मादाय आयुक्त दीपक खोचे यांनी सपत्नीक, त्यांच्या कार्यालयातील महिला अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने वैशालीचा साडीचोळी देऊन सत्कार आणि डोहाळे जेवणाचा कार्यक्रम साजरा केला. वैशाली पापळकर हिचा जीवनप्रवास हा एखाद्या संघर्षमय कादंबरीसारखा आहे. सुमारे तीस वर्षांपूर्वी नाशिक येथे कुंभमेळ्याच्या पर्वावर नदीकाठी ती बेवारस आणि मूकबधिर अवस्थेत पोलिसांना सापडली. बोलता-ऐकता न येणाऱ्या या बालिकेचे 'वैशाली' असे नामकरण बालकल्याण मंडळाने केले आणि त्यानंतर तिला वझ्झर येथील अंबादासपंत वैद्य दिव्यांग बालगृहाचे संचालक डॉ. शंकरबाबा पापळकर यांच्या ताब्यात देण्यात आले.

शंकरबाबांनी या कन्येला मायेची ऊब देत संत गाडगेबाबा मूकबधिर विद्यालयामध्ये चौथ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण दिले. नंतर तिने अंबादासपंत वैद्य बालगृहात अधीक्षक या पदावर राहून अनेक दिव्यांग मुला-मुलींची सेवा केली. पुढे तिची बदली स्वर्गीय गेंदीबाई श्रीनिवास अग्रवाल मतिमंद विद्यालय, परतवाडा येथे शिपाई पदावर झाली.

वैशालीच्या जीवनातील सर्वात मोठा क्षण दिनांक ९ फेब्रुवारी २०१९ रोजी आला.



त्यावेळी अमरावती जिल्ह्याचे तत्कालीन खासदार आनंदराव अडसूळ यांनी तिचे कन्यादान करून तिला 'बेवारस' ओळखीतून कायमचे मुक्त केले. विशेष म्हणजे तिचा जीवनसाथी अनिल हासुद्धा मूकबधिर बेवारस असून डोंगरी रिमांड होममधून अंबादास पंत वैद्य बालगृहात दाखल झालेला होता. दोघांचा विवाह शंकरबाबांच्या प्रयत्नातून मोठ्या थाटात पार पडला.

### धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे भाग्य!

लग्नाच्या तब्बल सात वर्षांच्या प्रतीक्षेनंतर वैशालीच्या जीवनात आई होण्याचे सौभाग्य लाभले. नुकतीच विभागीय धर्मादाय आयुक्त दीपक खोचे साहेब यांनी अचानक बालगृहाला भेट दिली. याचवेळी माझ्या या मुलीला सातव्या महिन्यानिमित्त साडीचोळी देऊन तिचा सत्कार करावा, अशी विनंती शंकरबाबांनी केली. तत्काळ प्रतिसाद देत खोचे यांनी 'हे तर आमच्या कार्यालयाचे मोठे भाग्यच आहे', अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. आज डोहाळे जेवनाचा सोहळा पार पडला. एका बेवारस कन्येचे डोहाळे पुरवण्याची शासकीय अधिकाऱ्यांनी घेतलेली ही भूमिका सेवाभावी आणि धर्मादाय कार्याला नवी दिशा देणारी असून, ही घटना इतिहासात नोंद घेण्यासारखी आहे, अशी प्रतिक्रिया शंकरबाबा पापळकर यांनी व्यक्त केली.

# पत्रकार नयन मोंढे यांच्या घरावर भ्याड हल्ला

## पत्रकार संरक्षण कायद्यान्वये कारवाईची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

स्थानिक वृत्तपत्राचे पत्रकार नयन मोंढे यांनी १४ ऑक्टोबर रोजी पंचशील नगर येथे बाल गुन्हेगारांचा धुमाकूळ ही बातमी प्रसिद्ध केली होती. सदर बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर वरली मटका चालक बाबू शेंडे याने वैयक्तिक रागातून त्यांच्या घरावर भ्याड हल्ला केला. या आल्याचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने जाहीर निषेध केला आहे. हल्लेखोरांवर पत्रकार संरक्षण कायदे अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीचे निवेदन पोलीस आयुक्त चावरिया यांना दिले.मंगळवारी रात्रीच्या सुमारास आरोपी बाबू शेंडे याने पत्रकार नयन मोंढे यांच्या घरात सुतळी बॉम्ब फेकला, तसेच मारण्याची धमकी देत अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर नयन मोंढे तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरिता गेले असताना, बाबू शेंडे आपल्या तीन-चार साथीदारांसह हातात लोखंडी पाईप घेऊन त्यांच्या घरासमोर आला व घरातील महिलांना देखील शिवीगाळ करून भय निर्माण केले.या घटनेनंतर परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित पत्रकारांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी पत्रकार संरक्षण कायदा व भारतीय दंड संहिता अंतर्गत आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.तसेच, नयना मोंढे यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी विविध पत्रकार संघटनांनी निवेदनातून केली केली आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची विभागीय सचिव जेष्ठ पत्रकार सूर्यवंशी मामा, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार शहराध्यक्ष विक्रम ढोके, महिला अध्यक्ष अर्चना रक्षे, प्रणय निर्बन,पवन श्रीवास्तव,उज्वल भालेकर, राज माहोरे, स्वप्निल सवाळे, सुरज दहाट, छगन जाधव, समीर अहमद, सुनील तळोकार,नासिर अहमद, अमोल कालपाडे,अमोल देशमुख, नकुल नाईक, अली अजगर दवावाला, संजय तायडे, शुभम मेश्राम, योगेश मोहकार, मयूर गिरी, मनीष गुळदे, सचिन चौधरी, सोमेश्वर जेवढे, गजानन मेश्राम, राजाभाऊ वानखडे त्यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तसेच विविध संघटनांचे पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

# रायसोनीच्या श्रद्धा एआयवर प्राप्तिकर विभागाचा छापा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ नागपूर**




कर चोरी आणि आर्थिक अनियमितता प्रकरणात गेल्या काही दिवसांपासून सक्रिय झालेल्या प्राप्तिकर विभागाने सलग चौथ्या दिवशी मंगळवारी शहरातल्या आणखी एका समुहावर छापा टाकत उलाढालीच्या व्यवहारांशी निगडीत कागदपत्रांची तपासणी केली. प्राप्तिकर विभागाच्या पथकाने मंगळवारी सकाळी कस्तुरचंद पार्क जवळच्या रायसोनी शैक्षणिक समुहाच्या श्रद्धा हाऊसवर इमारतीतील श्रद्धा आर्टिफिशियल इंटेलिजंस या कंपनीच्या कार्यालयावर हा छापा टाकला.

पथकातल्या ५ ते ६ अधिकाऱ्यांचे पथक सकाळी सातच्या सुमारास कार्यालयात धडकले. अधिकाऱ्यांनी सलग १२ तास कागदपत्रांची तपासणी केली. रायसोनी शैक्षणिक समुह मातृ संस्था असलेल्या या कंपनीच्या वार्षिक उलाढालीत आढळलेल्या त्रूटी आणि अनियमिततेमुळे प्राप्तिकर विभागाच्या पथकाने ही कारवाई केल्याची माहिती विभागातील सूत्रांनी दिली.माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातली श्रद्धा एआय ही रायसोनी समुहाची उपकंपनी आहे. तिने सादर केलेल्या वार्षिक ताळेबंदात अनियमितता आढळल्याने ही प्राप्तिकर विभागाने ही कारवाई केल्याची माहिती मिळत असून पथकाने या संदर्भात काही कागदपत्रेही सील केल्याची माहिती मिळत आहे. पथकाच्या या कारवाई दरम्यान श्रद्धा एआय कंपनीचे अंकेक्षण अधिकारी आणि लेखा विभागातील कर्मचाऱ्यांचीही यावेळी चौकशी करण्यात आली. रायसोनी समुहाचे जनसंपर्क अधिकारी अमित गंधारे यांनीही या छापा कारवाईला दुजोरा दिला. मात्र ही नियमीत तपासणी असल्याचे त्यांनी सांगितले.

कर चोरी प्रकरणात गेल्या काही दिवसांपासून प्राप्तिकर विभाग सक्रिय झाला आहे. विभागाने आठवडा भरात आधी पेट्रोलियम क्षेत्रातील गो गॅस कंपनीचे संचालक नितीन खारा यांच्या कार्यालयावर छापा टाकला होता. विभागाच्या गुन्हे अन्वेषण शाखेने (आय अँड सी. आय.) सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास खामला येथील उप निबंधक कार्यालयात छापा टाकला होता. रात्री उशीरापर्यंत ही कारवाई चालली. त्यापूर्वी याच प्रकरणात विभागाने काही दिवसांपूर्वी सिव्हिल लाईन्स आणि रेशिमबाग येथील उप निबंधक कार्यालयातही झडती घेतली होती. एन दिवाळीच्या सणात सुरू असलेल्या या कारवाईमुळे कर चुकवणाऱ्या उद्योजकांचे धाबे दणाणले आहेत.

# सांस्कृतिक कार्य विभागामार्फत संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी गाडगेबाबा या महानाट्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**



सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती या ठिकाणी दि. १६ ऑक्टोंबर २०२५ रोजी साय ६:३० वा. संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी गाडगेबाबा या नाट्य चे आयोजन केले आहे. याया कार्यक्रमात एकूण ५० कलावंत असून आपल्या राज्यातील महनीय व्यक्तींची माहिती आजच्या तरुण पिढीला व्हावी ,तसेच आपला समृद्ध असा वारसा जपण्यासाठी श्री आशिष शेलार सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली तसेच विभागाचे संचालक श्री विभीषण चवरे यांच्या नियोजनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत गाडगेबाबा यांचा इतिहास आपल्याला माहिती होणार असून याचा जास्तीत जास्त प्रेक्षकांनी आस्वाद घ्यावा असे आवाहन श्री विभीषण चवरे ,संचालक सांस्कृतिक कार्य यांनी केले आहे.

# पंचशील नगरात बाल गुन्हेगारांचा धुमाकूळ

## परिसरातील वरली मटका बंद करण्याची नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



शहरातील पंचशील नगर परिसरात अलिकडच्या काही दिवसांपासून बाल गुन्हेगारांचा धुमाकूळ सुरू असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री उशिरा तसेच सकाळच्या वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना विनाकारण अडवून त्रास देणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे पर्स हिसकावून नेण्याच्या घटना घडत आहेत.

स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, या टोळीतील मुलांचे वय १२ ते १७ वर्षांच्या दरम्यान आहे. हे मुलं रात्री गटागटाने बाहेर पडून परिसरात दहशत निर्माण करीत आहेत. काही नागरिकांनी त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता उलट धमक्या मिळाल्याची माहिती मिळाली आहे.या संदर्भात परिसरातील नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी दिल्या मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. सामाजिक संस्थांनी आणि पालकांनी या वाढत्या बाल गुन्हेगारीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली आहे. बालगुन्हेगारांचा बंदोबस्त करण्याची मागणी पंचशील नगर येथील त्रस्त नागरिक सातत्याने करीत आहेत. परिसरात शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम वाढवून अशा प्रवृत्तीवर नियंत्रण आणावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**वरली मटका चालकाचे पंटर**

पंचशील नगर येथे वरली मटका चालकाचा बाल गुन्हेगारांवर वरदहस्त असून, तो आपल्या अवैध व्यवसायाकरिता बाल गुन्हेगारांची सातत्याने वापर करीत असल्याने या परिसरात सुरू असलेल्या वरली मटक्यामुळेच बाल गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात फोपवली असून परिसरातील नागरिक दहशतीत वावरत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिवसानिमित्त ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, प्रसेनजित चव्हाण, श्रद्धा उदावंत, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, अधीक्षक निलेश खटके, तहसिलदार रूपेश खंडारे आदी उपस्थित होते. माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यानुषंगाने जिल्हा ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. सुरज मडावी यांनी यावेळी केले.

# बचतगटाच्या महिलांची १ लाख ३३ हजार रुपयांनी फसवणूक

## केवायसीच्या नावावर घेतला महिलेच्या अंगठ्याचा ठसा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मोर्शी**

मोर्शी ग्रामीण भागात बचतगटाच्या माध्यमातून कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले आहे. बचत गटांमध्ये शिक्षित महिलेसोबतच अशिक्षित महिलासुद्धा मोठ्या प्रमाणात सहभागी होत असल्याने याचा फायदा काही स्वार्थी महिला पुरुष घेत असून असाच प्रकार मोर्शी शहरात सुद्धा नुकताच घडला आहे तीन महिलेला केवायसी करायचे, असे सांगून त्यांच्या बोटाचा अंगठा व रजिस्टरवर स्वाक्षरी घेऊन त्यांच्या नातावर १ लाख २३ हजार रुपये कर्ज उचलल्याची तक्रार नुकतीच प्राप्त झाली आहे

शहरातील वार्ड क्रमांक १४ येथील सौ सुनीता हटवार यांनी मागील दहा वर्षापासून एका फायनान्स कंपनीकडून दुग्ध व्यवसायाकरिता म्हशी विकत घेण्यासाठी बरेच वेळा कर्ज घेतले होते. त्या कर्जाची त्या नियमित परतफेड करत असल्याने पुन्हा कर्ज काढण्यासाठी त्यांनी ४ जून २५ रोजी म्हशी विकत घेण्याकरिता व दुग्ध व्यवसाय करिता ७२ हजार ५१४ रुपये कर्ज घेतले आहे त्या कर्जाचा हप्ता आठवतधाला ९२० रुपये त्या नियमित भरत होत्या. या कर्जाचा हप्ता जमा करण्यासाठी एक महिला त्याच्याकडे येत होती व वसूल झालेली कर्जाची रक्कम कंपनीकडे जमा करीत होती दरम्यान सदर महिलेने सुनीताहटवार यांना केवायसी करण्याकरिता बोलावल्याने १९ फेब्रुवारीला सुनीता या केवायसीसाठी कार्यालयात गेल्या होत्या त्यावेळेस त्या ठिकाणी त्यांचा अंगठा घेतला, तसेच रजिस्टरवरसुद्धा सही घेतली असल्याचे सुनीताने तक्रारीत म्हटले. नंतर सुनीताकडे वसुली अरिसरकारी कर्जाचा हप्ता मागण्यासाठी आले असता त्यांनी तुमच्याकडे ४८ हजार २२६. रुपयांचे कर्ज असून त्याचा हप्ता ६०० रुपये बाकी असल्याचे सांगितले. मात्र सुनीताने हे कर्ज उचललेत नाही. असे सांगितल्याने त्या वसुली अधिकाऱ्यांनी त्यांनी दिलेलाअंगठा व रजिस्टरवर असलेली स्वाक्षरी दाखवली. यावरून आपली फसवणूक झालेली आहे. असे लक्षात आले. अशाच प्रकारच्या घटना सिमरन प्रठीण शेडा जमीर यांच्यासोबतसुद्धा घडली असून त्याच्या नावावर सुद्धा २५ हजार रु. व वंदना मारोतराव समरीत यांच्या माजावर ४८ हजार उपये कर्ज परस्पर उचलल्याचे समजते. यासोबतच आणखी काही महिलेच्या नावावरसुद्धा कर्ज उचलल्याची शक्यता नाकारता येत नाही.

# तळेगाव-खेड फाटा रस्त्याची दयनीय अवस्था; तातडीने दुरुस्तीची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील खेड फाटा-विष्णोरा-तळेगाव मार्गाची अवस्था अत्यंत खराब झाली असून, ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावरून अवजड खनिज वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने रस्त्याची पूर्णपणे दुर्दशा झाली आहे.

या रस्त्याचा वापर शाळकरी विद्यार्थी, रुग्ण, कामगार व सर्वसामान्य प्रवासी करतात. रात्रीच्या वेळी प्रवास अत्यंत धोकादायक बनत आहे. रस्त्यावर गिट्टी उघडी पडल्यामुळे अपघातही घडत आहेत.

भाजपचे मोर्शी तालुका सचिव सुनील ठाकरे यांनी सांगितले की, रस्त्याच्या या दयनीय अवस्थेकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष द्यावे. स्थानिक भाजप कार्यकर्ते बाळासाहेब ठाकरे, अमित ठाकरे, मनोहर ठाकरे, प्रदीप ठाकरे व इतरांनीही रस्त्याच्या त्वरित दुरुस्तीची मागणी केली आहे.जर एका महिन्यात दुरुस्ती झाली नाही, तर शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

# जलजीवन मिशनचे कंत्राटी कर्मचारी मानधनाविना, दिवाळी अंधारात जाण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५शिंदी बु.**




राज्य आणि केंद्र सरकारच्यासंयुक्त जलजीवन मिशन योजनेंतर्गत कार्यरत हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांची दिवाळी यंदा अंधारात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या चार महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने हे कर्मचारी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडले असून, शासनाच्या दुर्लक्षाबद्दल संताप व्यक्त होत आहे.

महाराष्ट्रभर कार्यरत जिल्हा तज्म, बीआरसी (गट संसाधन केंद्र) समन्वयक, डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि इतर कंत्राटी कर्मचारी जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन या केंद्र पुरस्कृत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेतः मात्र जुलै २०२५ पासून आजपर्यंतचे मानधन मिळालेले नाही.या काळात कर्मचाऱ्यांनी सातत्याने विभागीय कार्यालये तसेच राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संपर्क साधला. तथापि, केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झालेला नाही' अशी केवळ उडवाउडवीची कारणे देण्यात येत असल्याचे कर्मचाऱ्याऱ्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्या मनात असंतोष आणि नाराजीचा भडका उडाला आहे. काही कर्मचाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'आम्ही दिवसरात्र शासकीय योजना राबवितो, ग्रामस्तरावर जनतेशी संवाद साधतो, पाणीपुरवठा व्यवस्था आणि स्वच्छता उपक्रम यशस्वी करण्यासाठी धडपड करतो, पण आमचेच मानधन महिनोमहिने थकवले जाते, ही अत्यत अन्याय्य बाब आहे. राज्यभरातील सर्व जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्रधान सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग), महाराष्ट्र शासन यांना निवेदन देऊन थकीत मानधन तातडीने मंजूर करण्याची आणि निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. निधीअभावी कर्मचाऱ्यांच्या संसारात कोंडी निर्माण झाली आहे. घरगुती खर्च, भाडे, मुलांच्या शाळा-कॉलेजचे शुल्क आणि आगामी दिवाळी सणाच्या खर्चामुळे त्यांचे आर्थिक गणित पूर्णतः बिघडले आहे.

शासनाने या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावला नाही, तर राज्यभरातून तीव्र आआंदोलन उभारण्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# पदाचा दुरूपयोगः रिद्धपूरच्या सरपंचा अपात्र

## आचारसंहितेमध्ये नियमबाह्य ठराव घेतल्याचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५रिद्धपुर**



रिद्धपूर मोर्शी पंचायतसमिती अंतर्गत येत असलेल्या श्रीक्षेत्र रिद्धपूर ग्रामपंचायतच्या सरपंच हरखशा नाज सज्जाद अहेमद यांनी पदाचा दुरुपयोग तसेच कर्तव्यास कसूर केला आणि आचार संहितेमध्ये नियमबाहा ठराव घेतल्यामुळे व सरपंच पती ग्रामपंचायतच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करत असल्याचे चौकशी अहवालात आढळून आल्यामुळे त्यांना सरपंच तथा सदस्य पदाकरिता अपात्र घोषित करण्यात आले आहे.

श्रीक्षेत्र रिद्धपूर ही ग्रामपंचायत एकूण १७ सदस्य व थेट जनतेमधून निवडून आलेल्या सरपंच असे १८ सभासदाची ग्रामपंचायत आहे. रिद्धपूर येथील सरपंच यांनी लोकसभेवी आचार संहिता सुरु असताना नियमबाह्य ठराव घेतल्यामुळे व सरपंच पती प्रामपंचायतव्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करत असल्यामुळे व सरपच्या आपल्या पदाचा दुरुपयोग करत असल्यामुळे रिद्धपूर येथील ग्रामपंचायत सदस्य अब्दुल नसीम अब्दुल कयूम, गोविंद श्रीराम वानखडे प्रा. पं. सदस्य, मंगेश भाऊराव शेळके ग्रा.पं. सदस्य यांनी अपर आयुक्त अमरावती येथे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ ये कलम ३९१ नुत्तार याचिका दाखल केली होती. त्यानुसार रिद्धपूर सरपंच यांनी पदाचा दुरुपयोग व कर्तव्यात कसूर केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यांना अपर आयुक्त अमरावती यांनी १० ऑक्टोबररोजी सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले.

# शासनाचा नवा फतवा: आयडी कार्ड लावले नाही तर कर्मचाऱ्यांचा पगार कापणार

## शासन परिपत्रक झाले जारी : नियमाची करावी लागणार अंमलबजावणी

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

शासकीय कार्यालयात नागरिकांना अनेकदा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची ओळख पटत नाही, तसेच कर्मचारी भासवून खासगी व्यक्तींचीही लुडबुड सुरू असते. यामुळे अनेक गैरप्रकार आणि वादही होतात. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दर्शनी भागावर ओळखपत्र न लावल्यास शिस्तभंगाच्या कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रक जारी झाले आहे, तसेच एका दिवसाचा पगार कापण्याचाही इशारा देण्यात आला आहे.




सामान्य प्रशासन विभागाने १० सप्टेंबर २०२५ रोजी यासंदर्भात परिपत्रक जारी केले आहे. राज्य शासनाने शासकीय कार्यालयांमध्ये शिस्त आणि पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचा आणि कठोर निर्णय घेतला आहे. यापुढे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालयात प्रवेश करताना आणि कामकाजादरम्यान आपले ओळखपत्र (आयडी कार्ड) दर्शनी भागावर स्पष्टपणे लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना काटेकोरपणे पालन करावे लागणार आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे कर्तव्यावर कार्ड आवश्यक असणार आहे.सदरील आदेशाचा मुख्य उद्देश नागरिकांना योग्य अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची ओळख पटावी, जेणेकरून खोट्या व्यक्तींची लुडबुड, गैरप्रकार आणि वाद-विवाद टाळता येतील, तसेच प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त राखता येईल, असा आहे.या आदेशाच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख आणि विभागप्रमुख यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

### उल्लंघन केल्यास शिस्तभंग, पगार कपात

नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यावर थेट शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे परिपत्रकात स्पष्ट नमूद आहे, तसेच आवश्यकता भासल्यास पगारात कपात केली जाणार असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

### बऱ्याच कार्यालयात 'बाहेरच्यांची' लुडबुड

अधिकारी आणि कर्मचारी यांना कार्यालयात प्रवेश करताना, तसेच कामकाजाच्या वेळेत ओळखपत्र स्पष्टपणे लावणे अनिवार्य आहे. बऱ्याच कार्यालयात 'बाहेरच्यांची' लुडबुड असते. खुर्चीवर कोणती व्यक्ती बसलेली आहे, याची माहिती अनेकांना नसते. काही वेळा खासगी व्यक्ती किंवा दलालसुद्धा कार्यालयात असतात. त्यामुळे आता कर्मचाऱ्यांना आयकार्ड घालणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# रहाटगावमध्ये बनावट चलनी नोटांचा गोरखधंदा उघड

## नांदगाव पेठ पोलिसांची मध्यरात्री धडाकेबाज कारवाई, तीन जण ताब्यात तर एक फरार!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ नांदगाव पेठ**

रहाटगाव परिसरात काही इसम बनावट चलनी नोटा दैनंदिन व्यवहारात वापरत असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी मध्यरात्री धडाकेबाज कारवाई करत तिघा संशयितांना रंगेहात पकडले. या कारवाईत तब्बल २६ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या असून आणखी एक आरोपी फरार असल्याचे समोर आले आहे. या घटनेने अमरावती जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांना रहाटगाव परिसरात बनावट चलनी नोटांचा वापर होत असल्याची गुप्त माहिती मिळताच त्यांनी तत्काळ पोलीस पथकासह उपलब्ध पंचांना सोबत घेऊन नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या शासकीय वाहनाने घटनास्थळी रवाना झाले. रहाटगाव येथील वृंदावन कॉलनी परिसरात गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहितीनुसार काही इसम अंधाराचा फायदा घेत रस्त्याकडेला बसलेले दिसून आले. पोलिसांनी शासकीय वाहन थोड्या अंतरावर उभे करून शिताफीने सापळा रचला आणि तीन संशयितांना जागीच पकडले. आरोपी पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांना नाव विचारले असता त्यांची नावे संचित अरविंद चव्हाण (वय १९, रा. रहाटगाव प्लॉट), दीपक बाबुलाल खंडारे (वय ३२, रा. पंचशिल नगर, रहाटगाव) आणि संघरत्न राजेंद्र मोटघरे (वय ३६, रा. जुनी वस्ती, मस्जिदजवळ, रहाटगाव) अशी असल्याचे त्यांनी सांगितले. पंचासमक्ष अंगझडती घेतल्यावर संचित चव्हाण कडे ५०० रुपयांच्या २६ नोटा (१३,०००), दीपक खंडारे कडे १५ नोटा (७,५००) तर संघरत्न मोटघरे




कडे १२ नोटा (६,०००) मिळून एकूण २६,५०० रुपयांच्या बनावट नोटा ताब्यात घेण्यात आल्या. या सर्व नोटांचे बारकाईने निरीक्षण केले असता त्यावर आरबीआयचा लोगो व वॉटरमार्क नसल्याचे आणि पाण्याने पुसल्यावर रंग निघत असल्याचे दिसून आले. यावरून या नोटा बनावट असल्याचे स्पष्ट झाले. सर्व नोटा पंचासमक्ष सीलबंद करून जप्त करण्यात आल्या. चौकशीत संचित चव्हाण याने सांगितले की या बनावट नोटा आदित्य किशोर रामेकर (वय २५, रा. समर्थवाडी, रहाटगाव) याने बाजारात वापरण्यासाठी दिल्या होत्या.पोलीस शिपाई निलेश जानराव साविकर यांच्या फिर्यादी या प्रकरणात चारही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १७९ आणि १८० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांच्या या कारवाईने बनावट नोटांचा गोरखधंदा उघडकीस येताच रहाटगाव परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये पोलीस दलाच्या तत्परतेचे कौतुक व्यक्त होत आहे.

# माजी विद्यार्थीच शाळांना घडवणार

## शिक्षण विभागाने घेतला शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

राज्यातील सर्व जिल्हा परिषदनगरपालिका, महापालिका तसेच खासगी, अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करावा, असा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. या निर्णयाचा उद्देश माजी विद्यार्थ्यांचा शाळेच्या प्रगतीत थेट सहभाग वाढविणे आणि शाळेतील विविध उपक्रम, सुविधांच्या उभारणीत त्यांचा हातभार लागावा, हा आहे.राज्यातील प्रत्येक शाळेत 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करणे बंधनकारक असेल. या संघाच्या माध्यमातून शाळेचे माजी विद्यार्थी एकत्र येऊन शाळेच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी काम करतील. संघ नोंदणी शाळास्तरावर केली जाईल. प्रत्येक शाळेत माजी विद्यार्थ्यांची नोंदवही किंवा डिजिटल रजिस्टर ठेवले जाईल. त्यात विद्यार्थ्यांचे नाव, सध्याचा व्यवसाय, संपर्क क्रमांक व क्षेत्राची माहिती नोंदवली जाईल.संघाकडून रोख स्वरुपातील देणग्या स्वीकारल्या जाणार नाहीत. मात्र, शाळेला लागणाऱ्या वस्तू, साहित्य किंवा साधनांच्या स्वरुपात मदत दिली जाऊ शकते. यामुळे आर्थिक पारदर्शकता राखली जाईल.



### ...अशी असेल माजी विद्यार्थी संघाची रचना

संघामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि काही सदस्य अशी समिती असेल. मुख्याध्यापक किंवा शाळेचे वरिष्ठ शिक्षक हे मार्गदर्शक म्हणून कार्य करतील. संघाचा कार्यकाळ निश्चित कालावधीसाठी असेल आणि दरवर्षी नवीन निवडणुका घेतल्या जातील.

### सण-समारंभांत वार्षिक मेळावा घेणे अनिवार्य

शाळेच्या वर्धापनदिन, शिक्षक दिन, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन किंवा इतर कोणत्याही विशेष प्रसंगी माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळावा आयोजित करणे आवश्यक असेल. माजी विद्यार्थी शाळेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सुविधांच्या उभारणीत योगदान देतील. उदा. ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य, संगणक साधने, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे इत्यादींच्या उभारणीत मदत करतील.

# चायनीज मांजामुळे तरुणाचा गळा कापला; आयसीयूमध्ये दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**


अमरावती शहरात चायनीज मांजामुळे आणखी एक गंभीर अपघात घडला आहे. २६ वर्षीय सैयद सैफी हसन या तरुणाचा गळा धारदार नायलॉन मांज्याने कापल्याची घटना समोर आली असून, सध्या त्याच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.

सैयद सैफी हसन हे आपल्या दुचाकीवरून जात असताना अचानक रस्त्यावर लटकलेल्या चायनीज मांज्याच्या संपर्कात आले. मांजा थेट त्यांच्या गळ्यावर आला आणि तीव्र जखम झाली. अपघात इतका गंभीर होता की त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. सध्या सैयद सैफी हसनडॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, नायलॉन मांजा विकणाऱ्या दुकानदारांविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे. अशा जीवघेण्या मांज्याच्या विक्रीवर बंदी असूनही खुलेआम विक्री सुरू असल्याचे उघड झाले आहे. प्रशासनाने आणि पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.चायनीज मांज्यामुळे होणाऱ्या अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने या समस्येकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

# लालखडी रिंग रोडवरील प्लास्टिक कारखान्याला भीषण आग; लाखोंचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

अमरावती शहरातील लालखडी रिंग रोडवर असलेल्या एका प्लास्टिक कारखान्यातआज सकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीमुळे परिसरात प्रचंड घबराट पसरली. आग इतकी भीषण होती की तिच्या लपटा कंपोस्ट डिपोपर्यंत पोहोचल्या. काही वेळासाठी संपूर्ण परिसर धुराने आच्छादला होता.या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या अनेक गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी दमकल दलाला बराच वेळ प्रयत्न करावे लागले. अखेर काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. सुदैवाने या आगीत कोणतीही




जीवितहानी झाली नाही, मात्र लाखों रुपयांचे साहित्य जळून खाक झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, अशी शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांनी आणि अग्निशमन विभागाने घटनास्थळी पंचनामा केला असून, यासंदर्भात अधिक तपास सुरू आहे. स्थानिक नागरिक आणि कामगारांनीही मदतीसाठी पुढाकार घेतल्याचे सांगण्यात येते.

# दिवाळीत विकतचे गुलाबजाम, पेढे, मिठाई खातंय तर सावधान! ग्राहकांची वाढलेली मागणी लक्षात घेता भेसळ होण्याचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

वर्षातील सर्वात मोठा सण म्हणजे दिवाळी. दीप उत्सवामध्ये प्रत्येक जण गोडधोड पदार्थांचा आस्वाद घेत असतात. या सणासुदीच्या दिवसांमध्ये विकतचे गुलाबजाम, पेढे,



बर्फी व इतर मिठाई विकत घेऊन खात असाल तर वेळीच सावध होण्याची गरज आहे. अन्यथा तुमचे आरोग्य देखील धोक्यात येऊ शकते. दिवाळीच्या काळात गोड पदार्थांच्या विक्रीत प्रचंड वाढ होते. ग्राहकांची वाढलेली मागणी लक्षात घेता भेसळ होण्याचा धोका निर्माण होतो. भेसळीच्या गैरप्रकाराला रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून ३१ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम राबवली जात आहे. 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षेचा' या उपक्रमाद्वारे सणासुदीनिमित्ताने तुप, तेल, मिठाई, खारे पदार्थ व इतर अन्न पदार्थ उत्पादक दुकानांची तपासणी व अन्न नमुने घेण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. गुलाबजाम, श्रीखंड, बासुंदी, पेढे, बर्फी व इतर गोड पदार्थांना सणांच्या काळात अधिक मागणी असते. कच्चा माल म्हणून खवा वापरला जातो. वाढत्या मागणीचा गैरफायदा घेऊन अनेक जण खव्यात भेसळ करतात. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचतो. असे प्रकार घडू नयेत, यासाठी विशेष दक्षता घेतली जात आहे. पदार्थातील भेसळ रोखण्यासाठी तपासण्या व दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. त्यामुळे शहरात व जिल्ह्यात ठिकठिकाणी तपासणी मोहीम राबवली जात आहे.

# आयटीआयमध्ये मंत्र शिकणार; कुंभमेळ्यात पौरोहित्य करणार

## वैदिक विधीसाठी पुरोहित उपलब्धतेसाठी आयटीआयमध्ये अभ्यासक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

सरकारतर्फे 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पहिल्यांदाच् वैदिक संस्कार ज्युनिअर असिस्टंट ह नवा अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. पुढील वर्षी नाशिकमध्ये भरणाऱ्या कुंभमेळ्यामध्ये वैदिक विधीसाठी पुरोहित उपलब्ध व्हावेत म्हणून आयटीआयमध्ये अभ्यासक्रम सुरू केला जात आहे.



युवकांना त्वरित रोजगार मिळवता यावा, या उद्देशाने अल्प मुदतीचे रोजगारक्षम विविध अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योगसंगत ज्ञान दिले जाते, जे त्यांना स्वावलंबी आणि कौशल्यपूर्ण बनविण्यात मदत करतात.राज्यभरात कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता वाढविण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सौरउर्जा, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, कृत्रिम प्रज्ञा, ग्रीन हायड्रोजन, मोबाइल दुरुस्ती, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर व इतरही शेकडो नवे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

### वैदिक संस्कार ज्युनिअर असिस्टंट

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पहिल्यांदाच वैदिक संस्कार ज्युनिअर असिस्टंट हा अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. पुढील वर्षी नाशिकमध्ये भरणाऱ्या कुंभमेळ्यामध्ये वैदिक विधीसाठी पुरोहित उपलब्ध व्हावेत म्हणून आयटीआयमध्ये हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

**P. R. Pote Patil College of Nursing (B.Sc.), Amravati**

Pote Estate, Pote Patil Road, Kathora, Amravati

Contact Details : 9371062222, Email : prppconursing@gmail.com

Applications are invited from the eligible candidates for admissions Institute Level vacant seats after CAP round & IQ Quota

**B. Sc. Nursing 2025-26**

Qualifications:

- 12th Science (PCB Group 50% Open & 40% Category)
- MH-CET (B.Sc. Nursing)

Last Date of Admission is on or before 31st October 2025

NOTE :- Admission Schedule is displayed on our Notice Board & College Website.

Sd/- Principal


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत